महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१६/प्र.क्र.६९/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १७ जून, २०१६

वाचा -

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र-२००९ /(६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२.

२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/ स्वयंअर्थ/२०१५-१६/माध्य-क(३०१)/२९८१, दिनांक ५ मे, २०१६

प्रस्तावना -

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा यथास्थिती, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेस दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याकरिता तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासह, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे, त्याकरिता अर्ज मागविणे, व विहित पध्दतीने परवानगी देणे, यासाठी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) पारित केला असून सदर अधिनियम शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अंमलात आला आहे. तसेच, सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छूक असणा-या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर खाजगी नवीन शाळांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता नवीन शाळा मान्यता देणे, विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे याकरिता दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. सदर प्रस्तावांची छाननी करुन पात्र प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय-

१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अन्वये सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता प्राप्त झालेल्या एकूण ५३०१ प्रस्तावांपैकी

३७४३ शाळांचे प्रस्ताव पात्र ठरतात. त्यानुसार या सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या ३७४३ शाळांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून, नवीन शाळा स्थापन करणे आणि विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे याकरीता याद्वारे शासन परवानगी देण्यात येत आहे.

**२. शासन परवानगी/शाळांचा दर्जावाढ करण्याच्या अटी व शर्ती -**

२.१ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.**

२.२ पात्र ठरलेल्या संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने **अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

**अ)** ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत.

**ब)** ज्या व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच **रद्दबातल** ठरेल.

**क) सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई** इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास / शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून **परवानगी** (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वकष धोरणानुसार **ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस **मान्यता** (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत (N.O.C.)** प्रमाणपत्र देईल.

२.३ सोबतच्या विवरणपत्रातील यादीनुसार परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/दर्जावाढ शाळांना i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील

२.४ सदर आदेश संबधित संस्थांना १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

२.५ संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची

खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

२.६ संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआपच रद्द** समजण्यात येईल.

२.७ **यु-डायस डाटा:-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"***स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा***" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना **नोडल अधिकारी** म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता **" स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा"** असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१६०६१७१७१८५०९४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Ganpat Gunjal

Digitally signed by Ramchandra Ganpat Gunjal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=dc74b0493b4979ad0aa76763f873c23fa35ecb44970562d4aa14a832b6357e54, cn=Ramchandra Ganpat Gunjal
Date: 2016.06.18 13:45:18 +05'30'

**( रा. ग. गुंजाळ )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
५. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
८. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)
९. शिक्षण निरीक्षक(पश्चिम/उत्तर/दक्षिण) बृहन्मुंबई
१०.सर्व संबधित प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपालिका
११.निवडनस्ती (एसएम-२).

| अ.क्र | जिल्हा | संस्थेचे नाव व पता | शाळेचे नाव व पत्ता | नवीन शाळा/ दर्जावाढ | मंडळ संलग्नता | शाळेचा प्रकार | शाळेचे माध्यम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| ३७५ | पालघर | एल टी हेमलता आर राउत चॅरीटेबल ट्रस्ट संतोष भुवन गोखीवारे नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर | होली फेथ हायस्कुल अॅण्ड ज्युनियर कॉलेज संतोष भवन नालासेपारा पुर्व ता. वसई जि. पालघर | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते उच्च माध्यमिक सर्व शाखा (इयत्ता १ ली. ते १२ वी.) | इंग्रजी |
| ३७६ | पालघर | स्व. यशवंत केशव पाटिल स्म,ती चॅरीटेबल ट्रस्ट अॅण्ड गावठाण रोड विरार पश्चीम ता. विरार जि. पालघर | यश विद्ययानिकेतन स्कुल अॅण्ड ज्यु. कॉलेज निलेमारे नालासेपारा ता. वसई जि. पालघर | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते उच्च माध्यमिक सर्व शाखा (इयत्ता १ ली. ते १२ वी.) | इंग्रजी |
| ३७७ | पालघर | ओम स्वामी विवेकानंद एज्युकेसन ट्रस्टशिर्डी नगर , भायंदर पूर्व , ठाणे , ४०११०५ | संत जोसेफ अंड मेरी कॉन्वेंत स्कूलबोरी कॉलोनी , आचोळे रोड , नालासोपारा पूर्व , पालघर ४०१२०९ | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते उच्च माध्यमिक सर्व शाखा (इयत्ता १ ली. ते १२ वी.) | इंग्रजी |
| ३७८ | पालघर | सेंट जॉर्ज एज्युकेशनल ट्रस्ट, नालासोपारा पु ता वसई जि पालघर | सेंट मेरी स्कुल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज मोरेगाव,नालासोपारा ता वसई जि पालघर | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते उच्च माध्यमिक सर्व शाखा (इयत्ता १ ली. ते १२ वी.) | इंग्रजी |
| ३७९ | पालघर | महाकाली एजुकेशनल सोसायटीवासुदेव विद्यालय, महाकाली केव्ज रोड, अंधेरी (इस्ट), मुंबई ४०००९३. | आर सी मारुती हाई स्कूलपाल नगर रोड केल्ची पाडा राजावली जुचंद्र वसई पूर्व पालघर ४०१२०८ | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते उच्च माध्यमिक सर्व शाखा (इयत्ता १ ली. ते १२ वी.) | इंग्रजी |
| ३८० | पालघर | कानोसा सोसायटी, महाकाली केव्हज रोड,अंधेरी पु 400093 | कानोसा स्कुल,सिबीएसई माणिकपुर वसई रोड प जि पालघर 401208 | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक ते उच्च माध्यमिक सर्व शाखा (इयत्ता १ ली. ते १२ वी.) | इंग्रजी |
| ३८१ | पालघर | मिरा एज्युकेशन ट्रस्ट, 702 मौर्य हाउस, ऑफ न्यु लिंक रोड, अंधेरी प मुंबई 53 | ट्री हाऊस हायस्कूल यशवंत नगर, विरार वेस्ट, विल्लागे बोळींज, तालुका वसई जि पालघर | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक ते उच्च माध्यमिक सर्व शाखा (इयत्ता १ ली. ते १२ वी.) | इंग्रजी |
| ३८२ | पालघर | मिरा एज्युकेशन ट्रस्ट, 702 मौर्य हाउस, ऑफ न्यु लिंक रोड, अंधेरी प मुंबई 53 | ट्री हाउस हायस्कुल, वसई कोर्ट समेर, मालोंडे, ता वसई जि पालघर | नवीन शाळा | आय.सी.एस.ई | प्राथमिक ते उच्च माध्यमिक सर्व शाखा (इयत्ता १ ली. ते १२ वी.) | इंग्रजी |
| ३८३ | पालघर | लेट निर्मलादेवी एज्युकेशन ट्रस्ट, बिल्डींग नं 71, श्रीप्रस्त कॉम्प्लेक्स, ३ रोड,नालासोपारा जि पालघर 401203 | निर्मला हिंदी हायस्कुल, राजवली, सातवली-नायगांव लिंक रोड,वसई पु जि पालघर | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते उच्च माध्यमिक सर्व शाखा (इयत्ता १ ली. ते १२ वी.) | हिंदी |
| ३८४ | पालघर | श्री साई चंद्रराज शिक्षण संस्थानालेश्वर नगर , मोरेगाव , नालासोपारा पूर्व , पालघर , ४०१२०९ | संत एलिझाबेथ स्कूल नालासोपारा पूर्व , पालघर , ४०१२०९ | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते उच्च माध्यमिक कला-वाणिज्य (इयत्ता १ ली. ते १२ वी.) | इंग्रजी |
| ३८५ | पालघर | विकास एजुकेशन फॉडेशन सातीवली नाका वसई पु जि पालघर 401208 | न्यु लाईफ एजुकेशन इंगिलश हायस्कुल सातीवली नाका ता वसई जि पालघर 401208 | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते उच्च माध्यमिक वाणिज्य-विज्ञान (इयत्ता १ ली. ते १२ वी.) | इंग्रजी |
| ३८६ | पालघर | श्रीम केएलटीठी एजुकेशन सोसायअी द्वारा मदर मेरी ज्युनिअर कॉलेज नवघर रोड भायंदर इ जि ठाणे | श्रीमती कांतीदेवी इंटर नॅशनल स्कुल, सर्व्हे नं 180/185 श्रीप्रस्त निलेमोरे नालासोपारा प जि पालघर 401203 | नवीन शाळा | आय.सी.एस.ई | प्राथमिक ते उच्च माध्यमिक वाणिज्य-विज्ञान (इयत्ता १ ली. ते १२ वी.) | इंग्रजी |

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता दिलेल्या परवानगीबाबत

श्रीम. केएलटी एज्युकेशन सोसायटी संचलित श्रीमती कांतीदेवी इंटर नॅशनल स्कुल, सर्व्हे नं १८०/१८५ श्रीप्रस्था, नालासोपारा (प) जि. पालघर

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन शुद्धीपत्र क्रमांकः एसएफएस-१०१७/प्र.क्र.६५५/एसएम-२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक: १३ सप्टेंबर, २०१७

वाचा :-

शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. एसएफएस-१०१६/प्र.क्र. ६९/एसएम-२, दिनांक १७ जून, २०१६

शासन शुद्धीपत्र:-

शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक एसएफएस-१०१६/प्र.क्र.६९/एसएम-२, दिनांक १७.६.२०१६ सोबतच्या विवरणपत्रामधील अ.क्र. ३८६ मधील रकाना क्रमांक ५ मध्ये "श्रीमती कांतीदेवी इंटर नॅशनल स्कुल" ऐवजी "राहूल इंटरनॅशनल स्कूल" असे वाचावे.

२. सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा / दर्जावाढ करण्यास परवानगी देण्याबाबतच्या संदर्भाधीन दिनांक १७.६.२०१६ च्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती जशाच्या तशा सदर शाळेस लागू राहतील.

३. सदर आदेश संबंधित संस्थेस १५ दिवसाच्या आत कळविण्याची जबाबदारी संबंधित शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(आ.ना.भोंडवे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पालघर
७. निवडनस्ती (एसएम -२).

# विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, मुंबई विभाग,मुंबई.

जवाहर बालभवन, तळमजला नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी क्र.०२२/२३६३००८१/८६ फॅक्स क्र.२३६३००९०
ई-मेल-dd.mumbai@mahedu.gov.in, dydemumbai@yahoo.com


---

**शाळा परवानगी आदेश.**

जा. क्र.शिउसं/माध्य-४/स्वअशा/१६-१७/२०१६/१९०२९/३८६
दिनांक:- २४ जून, २०१६.

**प्रति,**

**सचिव/अध्यक्ष,**
**श्रीम केएलटीि एजुकेशन सोसायअी द्वारा**
**मदर मेरी ज्युनिअर कॉलेज नवघर रोड भायंदर इ जि ठाणे**

**विषय:-महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम,२०१२ अंतर्गत शाळांना परवानगी देण्याबाबत.**

**संदर्भ:**-शासन निर्णय क्र. एसएफएस-२०१६/प्र.क्र.६९/एसएम-२, दिनांक १७.६.२०१६

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम, २०१२ अंतर्गत नवीन शाळा/दर्जावाढ साठी परवानगी देण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयास अनुसरून आपल्या संस्थेस सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा/दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचे नावं व पत्ता | शाळेचे नावं व पत्ता | नवीन शाळा/ दर्जावाढ | मंडळ संलग्नता | शाळेचा प्रकार | शाळेचे माध्यम |
|---|---|---|---|---|---|
| श्रीम केएलटीि एजुकेशन सोसायअी द्वारा मदर मेरी ज्युनिअर कॉलेज नवघर रोड भायंदर इ जि ठाणे | श्रीमती कांतीदेवी इंटर नॅशनल स्कुल, सर्व्हे नं १८०/१८५ श्रीप्रस्त निलेमोरे नालासोपारा प जि पालघर ४०१२०३ | नवीन शाळा | आय.सी.एस.ई | प्राथमिक ते उच्च माध्यमिक वाणिज्य-विज्ञान (इयत्ता १ ली. ते १२ वी.) | इंग्रजी |

शासन निर्णय दिनांक १७ जून, २०१६ मधील अटी व बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदी तसेच खालील अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१. प्रत्येक प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १८ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ मधील नियम ११ अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याकडून मान्यता घेण्यात यावी. त्याचप्रमाणे माध्यमिक व उच्च माध्यमिक वर्गांना या कार्यालयाकडून प्रथम मान्यता घेण्यात यावी.

२. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम २०१२ नुसार देण्यात आलेली परवानगी अशी परवानगी मिळाल्यापासून १८ महिन्यांच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरू न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

३. सर्व संबंधितांच्या माहितीकरीता शाळेबाहेर स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावरील परवानगी प्राप्त नवीन/दर्जावाढ प्राप्त शाळा असे जाहीर फलकावर दर्शविणे आवश्यक राहील.

४. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदी आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ यातील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.

...२/-

५. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ दिनांक २१ मार्च, २०१४ व महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) नियम, २०१६ दिनांक १३ एप्रिल, २०१६ मधील अटी व शर्तीची कार्यपध्दती संस्थेवर बंधनकारक राहील.

६. सदर स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील मान्यता मिळालेल्या संस्थेने संबंधित अधिकाऱ्यांशी / शासनास पत्रव्यवहार करताना स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा/दर्जावाढ अशा प्रकारचे लेटर हेड वापरणे आवश्यक आहे.

७. सदर शाळांनी शासनाच्या/शिक्षण विभागाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधनियिम, २०१२ मधील कलम ४ (१) अंतर्गत तरतुदीनुसार अनुसूची "ग" मध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम कोणत्याही बँकेत मुदत ठेव म्हणून ठेवावी लागेल. तथापि, इरादा पत्र देण्यात येण्यापूर्वी, उक्त रक्कम ही दाननिधी निर्माण करण्यासाठीची प्रतिभूती ठेव म्हणून व्यवस्थापन आणि संबंधित जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या नावे संयुक्तरीत्या, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्राच्या स्वरूपात किंवा कोणत्याही राष्टीयीकृत बँकेतील मुदत ठेवीच्या स्वरूपात ठेवण्यात येईल, असे प्रमाणपत्र किंवा ठेव संबंधित जिल्हा शिक्षण अधिकाऱ्याकडे तारण म्हणून ठेवण्यात येईल, असे प्रमाणपत्र किंवा अशी ठेव नुतनीकरणाच्या अटीच्या अधिनतेने, किमान तीन वर्षाच्या कालावधीसाठी ठेवण्यात येईल.

९. मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या नियुक्तीस शैक्षणिक अर्हतेनुसार संबंधित शिक्षण निरीक्षक/शिक्षणाधिकारी यांच्याकडून मान्यता घेणे बंधनकारक राहील.

१०. कर्मचारी संच संबंधित शिक्षण निरीक्षक/शिक्षणाधिकारी यांचेकडून मंजूर करून घ्यावा.

११. शाळेचे हिशेब व सर्व प्रकारच्या नोंदवह्या अद्यावत ठेवणे आवश्यक आहे.

१२. शासन आदेशातील तरतुदीनुसार शिक्षक –पालक संघटनेची स्थापना करणे आवश्यक आहे.

१३. मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे असणे आवश्यक आहे.

१४. विशेषत: अग्निरोध संदर्भातील सुरक्षेबाबत योग्य ती कार्यवाही, विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने सर्व व्यवस्था व अग्निपासून कुठल्याही दुर्घटना होऊ नये, याबाबत प्रतिबंधात्मक दक्षता घेणे बंधनकारक राहील.

१५. शासन निर्णय क्र. संकीर्ण २००९/(९१६/०९)/माशि-१, दिनांक ३ नोव्हेंबर, २००९ मधील तरतुदीनुसार शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंत्याकडून शाळेची इमारत नॅशनल बिल्डींग कोडप्रमाणे असल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

वरील अटींनुसार योग्य ती कार्यवाही करावी. तसेच, हे पत्र मिळाल्यापासून १ महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी प्रस्ताव संबंधित शिक्षण निरीक्षक/शिक्षणाधिकारी यांचेकडे सादर करावा.

(बी.बी. चव्हाण)
विभागीय शिक्षण उपसंचालक,
मुंबई विभाग,मुंबई

**प्रत माहितीसाठी सविनय सादर:-**

१. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ०३२.

२. मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, आयुक्त (शिक्षण) यांचे कार्यालय, बालभारती, सेनापती बापट मार्ग, पुणे-४११ ००४.

३. मा.शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, शिक्षक भवन, १९२, नवीपेठ, निवारा वृध्दाश्रमाजवळ, गांजवे चौक, पुणे-४११ ०३०.

**प्रत :-**

शिक्षण निरीक्षक, उत्तर/दक्षिण/पश्चिम विभाग, मुंबई तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) जिल्हा परिषद, ठाणे/पालघर/रायगड यांना कळविण्यात येते की, उपरोक्त शाळेच्या मान्यतेबाबत उचित कार्यवाही करावी.

Regarding Grant of Permission to establish new school, similarly for up-gradation of existing class in school for the Academic Year 2016-17 under Maharashtra Self – Financed - School (Establishment & Rfegulations) Rules 2012

Government of Maharashtra
School Education & Sports Department
Government Resolution No SFS-1016/C.R.69/SM-2
Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk
Mantralaya, Mumbai – 400 032
Date: 17th June, 2016

Read –

1) Government Resolution, School Education & Sports Department, No *na-ha-pra-2009/(663/09 )Ma. Shi – 1, Dated 20 June, 2012*
2) *Letter from Education Director (Secondary & Higher Secondary), Maharashtra State, Pune No. Aa- Ma- Sha/ Self-Financed / 2015-16/ Madhya-Ka (301)/2981, dated 5 May, 2016.*

*Preface –*

For establishing new school, similarly currently existing schools, Higher Primary or Secondary, or Higher Secondary School for up-gradation purpose make provisions for grant of permission [License] similarly for establishing new school, to existing school up-gradation, call application for the same, and for issue of permissions [Licenses] as provided in the Government of '*Maharashtra Self-Financed-Assisted School (Establishment and Regulations) Act 2012 (01 of Year 2013) has passed Resolution which will be effective from Academic year 2013-14 Similarly CBSE, ICSE, IB, IGCASE and CIE etc desiring to get affiliated for English medium schools and issue no objection certificate certain procedures are set in accordance with the Government Resolution dated 20th June, 2012*

Proposals were called to submit the same by 30th November, 2015 for grant of New School / Up-gradation in existing school, for Academic Year 2016-17 as per the provisions of Self Financed-Assisted School. For further action on the points was under consideration before the Government after scrutinizing those proposals. After considering all the points the Government has taken decision as under:

## GOVERNMENT RESOLUTION

1 As per Maharashtra Self-Finance-Assisted School (Establishment & Regulation) Act, 2012 (Clause 1 Year 2013) Total 5301 proposals were received for academic year 2016-17 out of which 3743 proposals were considered eligible [Qualified] proposals. Accordingly in a letter enclosed herewith details were shown for 3743 schools to establish new schools and to up-grade existing schools for the academic year 2016-17; through this letter Government Permission [License] has been accorded

2 Government Permission / Terms and Conditions for School Up-gradation

2.1 It is necessary for Primary and Higher Primary schools to observe and follow strictly adhere and fully comply with the 'Children Free and Compulsory right to education Act, 2009 for the purpose of recognition of New School / Up-gradation and all the conditions, rules / provisions appearing in this letter and the rules and provisions made in the said Act and made in future, necessarily be fulfilled.

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

Continued 2

2.2 The Management of those school which are considered deserving must Comply fully with the provisions made in the Act 2009 for starting school for academic year 2016-17 as mentioned below the Permission [Intent Letter] is granted.

a) Those Managements who have fully complied with all the necessary items / conditions prescribed by the Government in order to start a new school, such Managements should after the commencement of academic year must apply, within a month, to seek preliminary [First] Recognition from the Education Officers of the concerned District.

b) Those Managements who have been considered deserving by the Government Resolution/Decision for the Academic Year 2016-17, such Managements who have not fulfilled with all the necessary items *(*conditions) provided by the Government in order to start a new school, then they must fulfill and comply Government Resolution / Decision and start school within 18 months from the date of Government Resolution / Decision otherwise the Permission granted shall automatically get cancelled.

c) CBSE, ICSE, IB, IGCSE and CIE etc desiring Managements /Educational Institutions for affiliation of Education Board to whom the government has considered deserving and issued with Permission under Government Resolution dated 20th June, 2012, as per the covenant shown therein Declaration for obtaining ***N. O. C*** first obtaining recognition is necessary, Such **recognition** to school – under the said Government Resolution in accordance with Chapter (10) District Education Officer (Primary)/ District Education Officer (Secondary)/ Education Inspector, Brihanmumbai – make an application to the Government for issuance of ***Affiliation, No Objection Certificate*** After scrutinizing the said application about the said school containing covenants, terms and conditions were fully complied with the Government will issue ***NOC*** for Affiliation to Board to concerned school

2.3 As per the enclosed letter showing details, the List of permissions granted to New School / Up-gradation: [i] The orders and working methods, procedures issued by the Government, time to time, similarly [ii] It is abiding and binding to comply and observe all the conditions provided in ***Maharashtra Self-Financed School (Establishment and Regulations) Act, 2012***

2.4 It would be responsibility of all the concerned Deputy Director of Divisional Education within 15 (fifteen) days

2.5 The conditions provided in Act, 2009 has been fulfilled / complied with in whole should be ascertained by the concerned competent officers and thereafter process actions for issue of Primary [First] Recognition.

2.6 The institution has sought permission for the medium, place of school etc. shall not be changed in future. The government has issued permission for a certain place at that place the school should be started, any other place then that place would be considered as the permission automatically ***cancelled***

Continued 3

2.7 ***U-DISE DATA*** – *i*n respect of the school granted permission by the Government for New School / Up-gradation, while filling information about school in U-DISE (Unified District Information System for Education) should mention "P***ermission is granted as per the provisions of Self-Financed-Assisted*** " means note in the Independent Preliminary Category will be the responsibility of the concerned institution to a get Serial No. On this subject to take further action State Project Director, Maharashtra Primary Education Council Mumbai has been declared as a ***NODAL OFFICER.*** Similarly, it is necessary for the school to display Notice Board outside the Main Entrance of School for information to those all concerned that Permission granted on the basis of Self Financed School

3. The said Government Resolution is available in the Website of Maharashtra Government www.maharashtra.gov.in for which its code No. is 201606171718509421 The order has been issued under digital signature

By order of the Governor of Maharashtra and in his name

Ramchandra
Ganpat Gunjal
Deputy Secretary,
Government of Maharashtra

Copy: -

1 Commissioner (Education) Government of Maharashtra, Pune
2 Commissioner of All Municipal Corporations
3 The Chief Executive Officers of all District Councils
4 State Project Director, Maharashtra Primary Education Council, Mumbai
5 Education Director, (Secondary and Higher Secondary), Maharashtra State, Pune
6 Education Director (Primary) Maharashtra State, Pune
7. All Divisional Education Deputy Director
8 All Education Officer (Primary / Secondary) Of District Council
9 Education Inspector (West/ North / South) Mumbai
10 All concerned Administrative Officer, Municipal Corporation/ Municipal Councils/
11 ________________ (S M 2)

ATTESTED BY ME

R. J. MISHRA M.A. LL.B
NOTARY GOVT. OF INDIA
108 B, Bhaidaya Nagar, 'B', Navghar Road, Bhayander EA
Dist Thane - 401 105

NOTARY GOVERNMENT OF INDIA
R. J. MISHRA MUMBAI & THANE Dist. Regd No. 4006

# (Emblem)

# Office of the Deputy Director of Divisional Education

## Mumbai Division, Mumbai

Jawahar Balbhawan, Ground Floor, Netaji Subhash Marg,
Churni Road, Mumbai – 400 004
Telephone No. 022/23630081/86 FAX NO 2363
E-mail – dd.mumbai@mahedu.gov.in. dydemumbai@yahoo.com

School License Order

Dispatch No. शिउसं/माध्य-4/स्व. अशा/16-17/2016/
19029/386

दिनांक: 24 जून 2016

To,
Secretary / Chairman
M/s K.L.T.D Education Society
Care of – Mother Mary Junior College,
Navghar Road, Bhayandar (E) Thane

Sub: With regard to grant of permission under Maharashtra Self-Financed-Assisted School (Establishment & "Regulation) Act, 2012

Ref: Government Resolution No. SFS-1016/C.R.69/SM-2, date 17.6.2016

Your institution has been accorded with permission [License] on the basis of the decision taken by the Government for grant of permission [License] – accordingly your institution has been granted permission [License] as per the provisions of Maharashtra Self-Financed – Assisted School (Establishment & "Regulation) Act, 2012 for opening New School / Up-gradation, from the Academic year 2016-17

| Name of Institution and Address | Name of School & Address | New School / Up-gradation | Board Affiliated | Type of School | Medium of instruction in school |
|---|---|---|---|---|---|
| M/s K.L.T.D Education Society Care of – Mother Mary Junior College, Navghar Road, Bhayandar (E) Thane | Smt. Kantidevi International School, S. No. 180/185, Shripast, Nilemore, Nallasopara (W) District Palghar PIN 401203 | New School | I.C.S.E. | Primary to Higher Secondary Commerce & Science (Std. 1st to 12th ) | English |

Provisions as mentioned in the Government Resolution dated 17/06/2016; and as mentioned in the Free Education for the children & strict Right to Education Act, 2009, similarly it is necessary to fulfill the following conditions:

1 Obtain recognition from the competent designated officer for every Primary and Higher Primary school under Provisions 18 of 'Free Education for the children & Compulsory Right to Education Act, 2009 and provisions 11 of Maharashtra Free and Compulsory Right to Education Rule 2011 accordingly for Secondary and Higher Secondary Section Preliminary [***First***] recognition from this office must be obtained

Continued 2

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

2 The License issued under Maharashtra Self-Financed-Assisted School (Establishment & "Regulation) Act, 2012 if the Management does not start school within 18 months from grant of such License, the said License shall become null and void (cancelled).

3. It is necessary to display on Public Notice Board showing 'License for New/Up-gradation is accorded as per the provisions of Self-Financed-Assisted School for information of every relevant person

4 To adhere and abide strictly on the provisions mentioned in Free Education for the children & Compulsory Right to Education Act, 2009. And Maharashtra Self-Financed – Assisted School (Establishment & "Regulation) Act, 2012

5 To follow and observe the functioning and procedures as mentioned in Maharashtra Educational Institution (Regulation for Fee) Act, 2011 dated 29/03/2014 and Maharashtra Educational Institution (Regulation for Fee) Act, 2016 dated 13/04/2016 and it will be binding on institution to follow and adhere Terms and Conditions for Functioning

6 It is necessary to use ***Letter Head*** mentioning 'New School / Up-grading License is granted as per the provisions of 'Self-Financed-Assisted School – in every correspondences, relating to concerned officers / correspondences with Government.

7 It is necessary to follow and adhere with all orders issued time to time by the Government / Education Department

8 Under section 4 (1) of Maharashtra Self-Financed School (Establishment & Regulation) Act, 2012 as mentioned in Schedule 'G' provided amount should be kept in any Bank as Fixed Deposit. Before issue of Intent Letter the said amount should be earmarked as Share Money of Donation Amount for construction purpose in the Joint Account of Management and the concerned District Officer of (Secondary) in the form of National Saving certificate or in the form of Fixed Deposit in any Nationalized Bank should be kept. For such certificate or such Deposit should be kept under provisions of Renewable for a Total period of 3 (three) years.

9 It is abiding and binding for appointment of Head Master / Teacher and other Teaching Staff employee, must be as per the criteria of Educations and is binding to obtain approval from the concerned Inspector / Education Officer.

10 Obtain approval from the concerned Inspector / Education Officer about the Employee Provident Fund.

11. It is necessary to keep properly the books of accounts, and all types of registers.

12 It is necessary to establish as provided as per the orders of Government form and constitute Teacher-Parents Association

13 It is necessary to provide Independent wash-rooms (Toilets) for Boys & Girls separately.

Continued 3

14. It is specially abiding to take proper care for Security providing fire fighting equipments with a point of view to the Health of the Students make proper, befitting, managements and take good precautions to avoid accidents of fire eruption and for this purpose take prohibitory expertise and methods.

15 As provided in Government Resolution No. संकीर्ण/2009/(916/09)/ मा शि-1 Dated 3/11/2009 It is necessary to obtain certificate from the Engineers of Government Public Works Department, or Public Works Department of District Council about the school building is in accordance with the National Building Code

It is necessary to take proper actions as per conditions aforementioned, accordingly submit proposal for Preliminary (First) Approval from the concerned Inspector/Education Officer within a month from the receipt of the Letter.

Signed
(B. K. Chavan)
Deputy Director Divisional Education
Mumbai Division Mumbai

Copy with compliments for Information:

1 Hon. Principal Secretary, School Education & Sports Department, Mantralaya Annex Building, Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032

2 Hon. Commissioner (Education) Maharashtra State Office of the Commissioner (Education) Balbharati, Senapati Bapat Marg, Pune 411 004

3 Hon. Education Director, (Secondary and Higher Secondary) Maharashtra State Directorate of Secondary and Higher Secondary Education Sikshak Bhavan, 192, Navipet, Near Nivara Oldhome,Ashram Ganjve chowk,Pune 411 030

ATTESTED BY ME

R. J. MISHRA M.A. L.L.B
NOTARY GOVT. OF INDIA
108 B, Bhaidaya Nagar, 'B', Navghar Road, Bhayander (E), Dist Thane - 401 105

Copy:

Inspector of Education, North/South/West Division, Mumbai
Similarly Education Officer (Primary / Secondary) District Council Thane / Palghar / Raigad,
This is to inform that do the needful proper action in respect of the Above said Schol.

NOTARY
R. J MISHRA
MUMBAI & THANE
Dist.
Regd No. 4006
GOVERNMENT OF INDIA

INTERNATIONAL SCHOOL, - Survey No. 180/185, Shreeprastha, Nallasopara (West) District Palghar, under the Aegis of SMT. KLT Education Society, Maharashtra Self-Financed – Assisted School (Establishment & "Regulation) Act, 2012 for opening New School / Up-gradation, from the Academic year 2016-17

Government of Maharashtra
School Education & Sports Department,
Government Corrigendum No SFS-1017/C.R.655/SM-2
Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Road,
Mantralaya, Mumbai 400 032
Dated: 13th September, 2017

Read:

Government Resolution: School Education & Sports Department
Sr. SFS-1016/C,R,69/SM-2 Dated 17th June, 2016

***Government Corrigendum Letter***

In the enclosed letter of details in Sr. No. 386 Column No. 5 of Government Resolution: School Education & Sports Department Sr. SFS-1016/C, R, 69/SM-2 Dated 17th June, 2016 in place of SMT. KANTIDEVI INTERNATIONAL SCHOOL, instead it should be read as 'RAHUL INTERNATIONAL SCHOOL'.

2 All the terms and conditions as stipulated in letter of permission dated 17/06/2016 as mentioned in reference, above shall be binding and strictly adheres for opening a new school or upgrading the current school for the academic year 2016-17 in terms of permission granted on the basis of Self Financed Assisted to the school

3 It shall be responsibility of the Education Deputy Director to inform the institution about the order within 15 days

NOTARY ★ GOVERNMENT OF INDIA ★ R. J MISHRA MUMBAI & THANE Dist. Regd No. 4006

By order and in the name of
Governor of State of Maharashtra
SD/-
(A. N. BHONDWE)
Upper Secretary
Government of Maharashtra

Copy to:

1 Commissioner, Education, Govt. of Maharashtra, Pune
2 State Project Director, Maharashtra Primary Education Council, Mumbai
3 Education Director (Primary) Maharashtra State, Pune
4 Education Director, (Secondary and Higher Secondary), Maharashtra State, Pune
5 All Divisional Education Deputy Director, Mumbai
6 Education Officer (Primary / Secondary) District Council, Palghar
7 Office Record (SM 2)

ATTESTED BY ME

R. J. MISHRA M.A. L.L.B
NOTARY - GOVT. OF INDIA
108 B, Bhaidaya Nagar, 'B', Navghar Road, Bhayander (E).
Dist Thane - 401 105

28 SEP 2017